ijindex
digital directory of indian journals

ISSN 2277 - 7539 (Print)
Impact Factor - 5.631 (SJIF)

# Excel's International Journal of Social Science & Humanities

An International Peer Reviewed Journal

February - 2021
Vol. I No. 15

Part - II

## Importance of Research in the Development of India

Issue Editor
**Dr. Laxman K. Ulgade**
Head of Public Administration Dept.
Havagiswami College, Udgir

Issue Editor
**Dr. Nandkumar N. Kumbharikar**
Public Administration Dept.
SPP College, Sirsala, Dist. Beed

EXCEL PUBLICATION HOUSE
AURANGABAD

# Index



| Sr. No. | Name | Title Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | प्रा. विरभद्र बिरादार | 'खंजन नयन' उपन्यास में व्यक्त सामाजिक तथा राजनीतिक जीवन | 4 |
| 2 | डॉ. कुलकर्णी वनिता | पर्यावरण और जल समस्या | 8 |
| 3 | डॉ. अनिल सरगर | धुल मे सपने तलाषते झरेखा आदिवासीयों के रास्ते के बच्चों का परिस्थितीजन्य अध्ययन | 12 |
| 4 | *डॉ. प्रमिला डी. भोयर* | पर्यावरण और जल समस्या | 17 |
| 5 | डॉ. उलगडे लक्ष्मण | "माझे कुटूंब – माझी जबाबदारी" कोरोना मूक्त महाराष्ट्र मोहिम : एक प्रशासकीय अभ्यास" (15 सप्टेंबर ते 25 ऑक्टोंबर) | 22 |
| 6 | डॉ. दिलीप बंजारा | लोकशाही शासन व्यवस्थेत युवकांचा सहभाग | 25 |
| 7 | प्रा.डॉ. बिरादार प्रतिभा | भारतातील बेरोजगारी – एक समाजशास्त्रीय अभ्यास | 29 |
| 8 | डॉ. सुशीलप्रकाश चिमोरे | कोरोनाच्या परिणामातून जन्माला आलेली मराठी कविता | 33 |
| 9 | डॉ. एकंबेकर संजीव | शारीरिक, मानसिक आणि सामाजिक आरोग्याचे घटक : एक संशोधनात्मक अभ्यास | 38 |
| 10 | डॉ.सुवर्णा रा. गाडगे | जीवघेणी महामारी कोरोना आणि स्त्रीजीवन | 44 |
| 11 | प्रा. डॉ. गणेश बेळंबे | स्वराज्याच्या शिल्पकार राष्ट्रमाता जिजाऊ | 49 |
| 12 | डॉ.आशा गिते | जागतिक कोरोना माहामारी एक अभ्यास | 57 |
| 13 | प्रा. हाके एन.आर. | भारतातील नाणे बाजार आणि भांडवल बाजार प्रणाली : एक संशोधनात्मक अभ्यास | 62 |
| 14 | प्रा.हारकर दत्तात्रय | कॉ.गंगाधर आप्पा बुरांडे यांचे जीवनकार्य | 66 |
| 15 | डॉ. राजेंद्र जेऊर | नवीन कृषी कायदे आणि किमान आधारभूत किंमतीची (MSP) समस्या | 69 |

| | | | |
|---|---|---|---|
| 16 | प्रा.डॉ.अशोक कानडे | सिंधू संस्कृती : समृध्द कलेचा प्राचीन वारसा | 74 |
| 17 | डॉ.अमित रामलिंग कवठाळे | सामाजिक संशोधनात सर्वेक्षण पद्धतीचे महत्त्व | 76 |
| 18 | प्रा.डॉ.लोखंडे बी.बी. | नवीन शैक्षणिक धोरण उच्च शिक्षणासाठी काल सुसंगत | 80 |
| 19 | डॉ. बाळासाहेब निर्मळ | भारतीय रोजगार निर्मितीमध्ये सार्वजनिक उपक्रमांचे योगदान | 82 |
| 20 | प्रा. डॉ. बब्रुवान केरबाजी मोरे | महान समाजसुधारक महात्मा बसवेश्वरांचे कार्य | 87 |
| 21 | डॉ. रायठक दिपमाला | कौटूंबिक, औद्योगिक समस्या | 91 |
| 22 | डॉ. सांगळे भगवान | ग्रामीण विकास प्रषासनाचे पर्यावरण | 94 |
| 23 | प्रा.डॉ. सवाई एम. के. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची सामाजिक विचारसरणी व कार्य | 99 |
| 24 | सौ. सुनिता रंगारी | मराठी काव्यातून उमटलेली शेतकरी समस्या : एक वेध | 101 |
| 25 | डॉ. मुक्ता सोमवंशी | "स्वच्छ भारत अभियान -एक चिकित्सक अभ्यास" विशेष संदर्भ सोनपेठ तालुका | 106 |
| 26 | प्रा.शिवकुमार उस्तुर्गे | स्त्री-भ्रूण हत्या : एक सामाजिक समस्या | 110 |
| 27 | प्रा.अरूणा वाळके | महाविद्यालयीन विद्यार्थ्यांमध्ये मोबाईलचा वापर : एक अभ्यास संदर्भ : श्री पं.पा. महाविद्यालय, सिरसाळा | 113 |
| 28 | प्राचार्य डॉ. पुष्पा तायडे | बहुराष्ट्रीय कंपन्याचा भारतीय अर्थव्यवस्थेवर प्रभाव | 116 |
| 29 | डॉ.एन.एन. कुंभारीकर | सुशासन : एक आदर्श प्रशासकीय व्यवस्था | 124 |
| 30 | डॉ.दाडगे सुरेखा | नवीन कृषी कायदे २०२० : आपेक्षा आणि फायदे व तोटे | 126 |

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
T.Sonpeth Dist.Parbhani



# "स्वच्छ भारत अभियान -एक चिकित्सक अभ्यास" विशेष संदर्भ सोनपेठ तालुका

प्रा.डॉ. मुक्ता गोविंदराव सोमवंशी

सहयोगी प्राध्यापक व लोकप्रशासन विभाग प्रमुख

कै. रमेश वरपुडकर महाविद्यालय, सोनपेठ जि.परभणी

प्रस्तावना:-

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी २ ऑक्टोबर २०१४ रोजी महात्मा गांधीजींच्या जयंतीच्या निमित्ताने स्वच्छ भारत अभियानाचा प्रारंभ केला. ज्याचा उद्देश संपूर्ण भारतामध्ये स्वच्छता निर्माण करण्यासाठी भारतातील प्रत्येक कुटुंबासाठी शौचालयाची निर्मिती करणे होता. २ ऑक्टोबर २०१९ ला महात्मा गांधीजींची १५०वी जयंती असल्या कारणाने त्यांच्या जयंतीच्या निमित्ताने खऱ्या अर्थाने महात्मा गांधीजींना आदरांजली ठरेल. कारण स्वच्छ भारत, स्वयंपूर्ण गाव हे महात्मा गांधीजींचे स्वप्न होते.

यापूर्वी स्वच्छतेच्या अनुषंगाने १ एप्रिल १९९९ मध्ये भारत सरकारने व्यापक स्वरूपात ग्रामीण स्वच्छतेचा कार्यक्रम राबविला. महाराष्ट्र सरकारने २०००-२००१ मध्ये संत गाडगेबाबा ग्राम स्वच्छता अभियाना द्वारे खेड्यांमधून स्वच्छतेची चळवळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच निर्मल ग्राम अभियान केंद्रीय स्तरावरून राबविण्यात आले. परंतु अपेक्षित यश मिळू शकले नाही.

राष्ट्रसंत गाडगे महाराज व तुकडोजी महाराज यांनी स्वच्छतेचा मंत्र दिला आहे. गाडगे महाराजांनी तर आपले पूर्ण आयुष्य स्वच्छतेला वाहून घेतले. परंतु जनतेला स्वच्छतेचे महत्त्व ओळखता आले नाही. म्हणूनच स्वातंत्र्याच्या सात दशकानंतरही आमच्या देशात स्वच्छ भारत अभियानाची आवश्यकता पडते. म्हणूनच प्रस्तुत शोध निबंधाचा "विषय स्वच्छ भारत अभियान एक चिकित्सक अभ्यास- विशेष संदर्भ सोनपेठ तालुका" हा निवडण्यात आला आहे.

या शोधननिबंधातून सोनपेठ तालुक्यातील स्वच्छ भारत अभियाना विषयीचे मूल्यमापन करून, हे अभियान किती प्रमाणात यशस्वी झाले आहे? या अभियानास समोर कोणत्या अडचणी आहेत? २ ऑक्टोबर २०१९ पर्यंत सोनपेठ तालुका संपूर्ण स्वच्छ होऊन हागणदारी मुक्त झाला का? या प्रश्नांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

संशोधन पद्धती

तथ्य संकलन- प्रस्तुत शोधनिबंध हा मानवी समाजाशी संबंधित असल्यामुळे माहिती संकलनासाठी प्राथमिक स्त्रोत व दुय्यम स्त्रोतांचा वापर करण्यात आला आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Tq.Sonpeth Dist.Parbhani



**प्राथमिक स्त्रोत-** स्वच्छ भारत अभियानाची वास्तविक परिस्थिती अभ्यासण्यासाठी प्रथम नागरिकांच्या भेटी घेऊन त्यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून माहिती गोळा करण्यात आली. यासाठी मुलाखत अनुसूची चा वापर करण्यात आला.

**दुय्यम स्त्रोत-** संदर्भग्रंथ, परिपत्रक, शासकीय दस्तऐवज, वृत्तपत्रे, मासिक व इंटरनेटच्या माध्यमातून माहितीचे संकलन केले आहे.

**संशोधनाचे उद्देश**

१. सोनपेठ तालुक्यातील स्वच्छ भारत अभियाना चा प्रभाव अभ्यासणे.

२. स्वच्छ भारत अभियाना समोरील अडथळे स्पष्ट करणे.

३. स्वच्छ भारत अभियानाचे मूल्यमापन करणे.

४. स्वच्छ भारत अभियान आतील जनतेचा सहभाग अभ्यासणे.

**संशोधन विषयाचे महत्त्व :**

शासकीय स्तरावरून विविध योजना राबवून जनतेचा सर्वांगीण विकास घडवून आणण्याचा प्रयत्न केला जातो. जनतेच्या सहभागाशिवाय शासकीय योजना यशस्वी होऊ शकत नाहीत. म्हणून जनतेचा सहभाग असावा लागतो. स्वच्छ भारत अभियाना मध्ये जनतेचा सहभाग किती प्रमाणात अपेक्षित आहे? आणि प्रत्यक्षात जनतेचा सहभाग कसा आहे? याचा अभ्यास या संशोधनातून करण्यात आला आहे. तसेच स्वच्छ भारत अभियानामुळे सर्वसामान्य जनतेला कोणते फायदे मिळाले आहेत? जनतेची या अभियानाविषयी काय मते आहेत ? या सर्व बाबींच्या अभ्यासाच्या दृष्टीने हा विषय महत्त्वाचा आहे.

**गृहीत कृत्य:-**

१.सोनपेठ तालुक्यात पूर्णतः शौचालयाचा वापर होत नाही.

२. सोनपेठ तालुक्यात स्वच्छतेविषयी जनजागृतीचा अभाव आहे.

**नमुना निवड-** सोनपेठ तालुक्यात एकूण ४२ ग्रामपंचायती आहेत. त्यापैकी १६ ग्रामपंचायती व नगरपालिका क्षेत्रातील ७५ लोकांच्या मुलाखती घेण्यात आल्या आहेत.

**माहितीचे विश्लेषण-** प्रस्तुत शोधनिबंधासाठी प्राथमिक स्त्रोताच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण खालील प्रमाणे केले आहे .

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani



| तक्ता क्र. | प्रश्न | होय | नाही |
|---|---|---|---|
| १ | आपल्याकडे शौचालय आहे का? | ९३.३७% | ६.६३% |
| २ | शासकीय बांधकामातून शौचालयाचे बांधकाम केले का? | ६०.००% | ४०.००% |
| ३ | स्वच्छ भारत अभियानात ग्रामपंचायतीचा सहभाग आहे का? | ८८.७७% | २१.३३% |
| ४ | गुड मॉर्निंग पथक नेमले जाते का? | ३८.८८% | ६१.१२% |
| ५ | हागणदारी मुक्त गाव झाले का? | २५.००% | ७५.००% |
| ६ | शौचालय असून वापर न करणारे लोक आहेत का? | ६६.००% | ३४.००% |
| ७ | आपल्या गावात शुद्ध आणि स्वच्छ पाणी पुरवठा होतो का? | ५४.६६% | ४५.३३% |
| ८ | सांडपाण्याची व्यवस्था केली आहे का? | ५७.३३% | ४३.३७% |
| ९ | नाल्यांची सफाई नियमितपणे केली जाते का? | ३८.६६% | ६१.३४% |
| १० | कचऱ्यासाठी घंटा गाडी ची व्यवस्था आहे का? | १०.३७% | ८९.३३% |
| ११ | कचऱ्याचे वर्गीकरण केले जाते का? | २०.००% | ८०.००% |
| १२ | आपल्या गावात स्वच्छ भारत अभियानाचा फायदा झाला का? | ५२.००% | ४८.००% |

उपरोक्त तक्त्यांच्या विश्लेषण आवरून असे दिसून येते की स्वच्छ भारत अभियाना मध्ये सर्वसामान्य नागरिकांचा सहभाग कमी प्रमाणात आहे. तसेच वरील तक्त्यांच्या विश्लेषणा वरून असेही निदर्शनास येते की, स्वतः नागरिक स्वच्छते विषयी जागरूक नाहीत. शौचालय असून सुद्धा शौचालयाचा वापर न करणारे लोक मोठ्या प्रमाणात दिसून येतात. तसेच ग्रामपंचायतींनी स्वच्छता अभियानामध्ये सहभाग बऱ्यापैकी घेतला आहे. वरील तक्त्यावरून सोनपेठ तालुक्यातील हागणदारी मुक्त गावांची संख्या २५% दिसून येते. येथे विशेष बाब म्हणजे शौचालय असलेल्या कुटुंबांची संख्या ९३ .३७ टक्के एवढी आहे. परंतु लोकांकडून शौचालयाचा वापर केला जात नाही. याचे कारण विचारले असता बहुतांश मुलाखत दात्यांनी पाण्याची कमतरता असल्याचे मत मांडले आहे. तसेच काही लोकांना शौचालयाचा वापर करणे आवडत नाही. असेही त्यांच्या मुलाखती च्या वेळी स्पष्ट झाले.

उपरोक्त विश्लेषणातून शोधनिबंधासाठी निश्चित करण्यात आलेले गृहीत कृत्य सत्य असल्याचे सिद्ध होते.

**निष्कर्ष:-**

१. शौचालय असून त्याचा म्हणावा तसा वापर होत असल्याचे दिसून येत नाही.

२. पाणीटंचाईमुळे स्वच्छ भारत अभियान प्रभावित झाल्याचे दिसून येते.

३. सांडपाण्याची व्यवस्था केली आहे परंतु नाल्यांची साफसफाई वेळच्यावेळी केली जात नाही.

४. ग्रामपंचायतींनी सहभाग घेतला परंतु जनतेचा सहभाग फार कमी दिसून आला.

Late Ramesh Warpudkar ACS College Sonpeth Pin-431516 Dist. Parbhani

शिफारसी:-

५. स्वच्छ भारत अभियान यशस्वी करण्यासाठी जनतेचा सहभाग वाढविणे अत्यावश्यक आहे.

६. शौचालय वापराबाबत ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणात जनजागृती करणे आवश्यक आहे.

७. आरोग्याच्या दृष्टीने नाल्यांची साफसफाई व कचऱ्याचे व्यवस्थापन करणे आवश्यक आहे.

८. पाणी टंचाईवर मात करण्यासाठी पाण्याचे स्त्रोत वाढविणे त्याचबरोबर सांडपाण्यावर प्रक्रिया करून त्याचा पुनर्वापर करणे आवश्यक आहे.

प्रत्येक गाव स्वच्छ आणि सुंदर असणे आवश्यक आहे. कारण यामुळे गावातील लोकांचे आरोग्य उत्तम राहील. परिणामी गावाच्या विकासाला मोठ्या प्रमाणात हातभार लागेल. प्रत्येक गाव समृद्ध झाल्यामुळे खऱ्या अर्थाने संपूर्ण भारतीयांचा विकास होईल.

संदर्भसूची-

१. www.India.gov.in

२. arthgyani.in

३. Vidyawarta International Multilingual Research Journal April to June 2017

○○○

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani